अहवाल दिनांक : 13/09/2020

महाराष्ट्र शासन

# गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

। महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ।

गाव :- **अकोली खु ( 530146 )** तालुका :- **अकोला** जिल्हा :- **अकोला**

गट क्रमांक व उपविभाग : **12/9/3/10**

भू-धारणा पध्दती : **सरकार** शेताचे स्थानिक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. भोगवटादाराचे नांव क्षेत्र आकार पो.ख. फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|
| क्षेत्राचे एकक **आर.चौ.मी**<br>अकृषिक क्षेत्र<br>बिन शेती 0.04.07<br>आकारणी 0.00 | 745 खुली जागा 0.04.07 ( 1 ) | कुळाचे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>अकृषिक वापर - रहिवास (गावठाणाबाहेरील)<br>एन ए पी 34/अकोली खुर्द/11/2011-12 दि 23/12/2011 ( 1873 )<br>प्रलंबित फेरफार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक --- व दिनांक --- |
| जुने फेरफार क्र. | | सीमा आणि भूमापन चिन्हे |

# गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

। महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ।

गाव :- **अकोली खु ( 530146 )** तालुका :- **अकोला** जिल्हा :- **अकोला**

गट क्रमांक व उपविभाग : **12/9/3/10**

| | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | | | | |
| | | | | | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | | | | | | | | |
| वर्ष | हंगाम | मिश्रणाचा संकेत क्रमांक | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरूप | क्षेत्र | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| | | | आर. चौ.मी | आर. चौ.मी | | आर. चौ.मी | आर. चौ.मी | | आर. चौ.मी | आर. चौ.मी | | आर. चौ.मी | | |

सूचना :- सदरचे क्षेत्र अकृषक क्षेत्रामध्ये रुपांतरीत झाले असल्याने या क्षेत्रासाठी गाव नमुना न.१२ ची आवश्यकता नाही

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 10/08/2022
सांकेतिक क्रमांक :- 27050004005133000082022160

( नाव :- उज्वल शिवदास मानकिकर )
तलाठी साझा :- अकोली खुर्द ता :- अकोला जि :- अकोला

10-8-2022

**श्री. सुनिल विचनकर, उपविभागीय अधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला.**

रामाक्र.एनओपी-३४/अकोली खुर्द./११/२०११-२०१२

अर्जदार :-
१. शैलेषकुमार शर्मा (HUF)
२. वरुणकुमार पुरुषोत्तम शर्मा
३. मोहीनी प्रकाश जोशी
४. धिरज हरीषकुमार पंचोली
सर्व रा.द्वारा/- न्यु राधाकिसन प्लॉट अकोला

## आदेश

(पारित दिनांक २३ माहे डिसेंबर २०११)

आवेदक १. शैलेषकुमार शर्मा (HUF) २.वरुणकुमार पुरुषोत्तम शर्मा ३.मोहीनी प्रकाश जोशी ४. धिरज हरीषकुमार पंचोली सर्व रा.द्वारा/- न्यु राधाकिसन प्लॉट अकोला यांनी त्यांचे मालकीच्या मौजे अकोली खुर्द. ता.जि. अकोला येथील शेत सर्व्हे नं. १२/९ क्षेत्र ०.९० हे.आर. पैकी ०.४० हे.आर. या शेतजमिनीचे निवासी प्रयोजनाकरीता अकृषक वापराची परवानगी मिळणेसाठी विहीत नमुण्यात अर्ज सादर केला आहे. अर्जासोबत अर्जदाराने मालकीहक्काबाबत ७/१२ उतारा, २. टिपण उतारा, ३. मोजणी शिट (ब) प्रतीवरुन मोजणी शिटची प्रत ४. प्रस्तावित भुखंडक अभिन्यासाचे प्रती संलग्न केलेल्या आहेत. प्राप्त अर्जाचे अनुषंगाने प्रकरण पंजीबध्द करुन घेण्यात येऊन प्रकरणात पुढील चौकशी/कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

२. प्रकरण तपासणी करुन अकृषक परवानगीबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात येऊन, मामल्यात सदरच्या प्रस्तावित जमिनीचे बाबतीत दिनांक ८.९.२०११ रोजी जाहीरनामा काढुन तहसिलदार अकोला, सचिव ग्राम पंचायत अकोली खु., संबंधित गाव तलाठी अकोली खु. यांचेकडे प्रसिध्दीस पाठविण्यात आला. तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावर लावुन प्रसिध्द करण्यात आला.

२. आवेदकाने सादर केलेल्या भुखंडक अभिन्यासांबाबत संबंधित विभाग/कार्यालये यांचेकडुन अभिप्राय मागविण्यात आले आहेत व मामल्यासह ठेवले आहेत. संबंधित विभाग/कार्यालय यांचेकडुन प्राप्त अभिप्राय-अहवाल बाबत खालील प्रमाणे माहिती विवेचन देण्यात येत आहे.

अ) सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अकृषीक/मौजे अकोली खु/स.क्र.१२/९ /ससंअ १३४१ दिनाक २४.११.२०११ नुसार तात्पुरती मंजुरी प्रदान करुन, तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे प्रत्यक्ष तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख अकोला यांचेकडुन भुखंड निहाय मोजणी करुन घेण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार प्रकरणात अर्जदाराने भुखंड निहाय मोजणीकरीता एकुण ९ भुखंडाचे मोजणी फी रक्कम १०,०००/- चलान क्र.१९ दिनांक २५.११.२०११ नुसार भरणा केला आहे.

अ-१) प्रकरणात तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख अकोला यांनी मो.र.क्र.५९८/११ नुसार सदरहू प्रस्तावित जमिनीचे तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे प्रत्यक्ष भुखंड निहाय मोजणी करुन अहवाल सादर केला आहे.

अ-२) प्रकरणात प्राप्त भुखंडक निहाय मोजणीच्या क प्रती प्रमाणे अर्जदार यांनी सिमांकित अभिन्यास या कार्यालयास अंतीम मंजुरीसाठी सादर केले असता, सिमांकित अभिन्यासाच्या प्रती, सहायक संचालक नगर रचना अकोला यांना अंतीम मंजुरीचे शिफारसीसाठी पाठविण्यात आल्यात. त्यानुसार त्यांचेकडील पत्र क्र.अकृषी/मौजे अकोली खु./स.क्र.१२/९/ससंअ १४३० दिनांक १६.१२.२०११ नुसार नेहमीच्या अटी व शर्थीस अधिन राहून सिमांकित अभिन्यासास अंतीम मंजुरी देऊन निवासकामी अकृषक आकारणी निर्धारित करुन देण्यासाठी शिफारस केली आहे. तत्पुर्वी प्रकरणात खालील विभागाकडुन अभिप्राय-अहवाल मार्गविण्यात आले असुन त्यांनी खालील प्रमाणे अहवाल दिले आहेत.

154

ब) पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-२८/पुनर्वसन/आस्था/कावि-५२५/२०११ दिनांक ५.१२.२०११ नुसार मौजे अकोली खुर्द येथील शेत सर्व्हे नं. १२/९ क्षेत्र ०.४० हे.आर. ह्या जमिनीचा अतिरिक्त जमिन म्हणुन संपादनाचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे अहवालीत केले आहे.

क) उपजिल्हाधिकारी, भुसंपादन (कापुमोप्र) अकोला यांनी पत्र क्र.कक्ष-८/अका-१/भुसंपादन/भुसंअ/काचि-१५१७/२०११ दिनांक २.१२.२०११ नुसार सदरहू मौजे अकोली खुर्द ता.जि.अकोला येथिल शेत सर्व्हे नं.१२/९ मधिल क्षेत्र ०.४० हे.आर जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव प्राप्त झाले नाही. यापुर्वी अकोली खुर्द येथील शेत सर्व्हे नं.१२/९ मधिल ह्यापुर्वी जमिन भुसंपादन प्रकरणात करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये अंतर्भुत आहे किंवा नाही या विषयी खात्री करुन घ्यावी असे कळविले आहे. तसेच विशेष भुमि संपादन अधिकारी (पु.) पं.कृ.वि. अकोला यांनी पत्र क्र.अका/विभुसंअ/(पु) पंकृवि/कावि-५६६/११ दिनाक १.१२.२०११ नुसार अहवाल सादर केला आहे.

ड) मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ, अमरावती यांनी पत्र क्र.३७७१/ दिनांक ५.१२.२०११ नुसार मौजे अकोली खुर्द ता.जि..अकोला येथील शेत सर्व्हे नं.१२/९ मधिल क्षेत्र ०.४० हे.आर जमिन अमराती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सपादनात नाही असे कळविले आहे.

इ) मंडळ अधिकारी अकोला यांनी स्थळ निरीक्षण करुन अहवाल सादर केला आहे. आपले अहवालात उच्च दाबाची विद्युत वाहीनी गेली नाही, सदरहू जमिन पडीत असुन अर्जदार यांचेच ताब्यात असल्यचे नमुद केले आहे.

३. प्रकरणात सदरहू जमिनीचे अकृषक आकारणीस रुपांतर करणेबाबत, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., अकोला, कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यंना पले नाहरकत प्रमाणपत्र/अभिप्राय/अहवाल सादर करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.प्र.१/उविअ/काचि-१७१९/११ दि. ८.९.२०११ . त्याच .प्रमाणे प्रकरणात कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब तारमार्ग बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युंत मंडळ अमरावती यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता प्रकरणात प्राप्त झाले नाहीत. सबब शासन परिपत्रक दिनांक १२.१०.१९८८ अन्वये त्यांची नाहरकत गृहीत धरण्यात येत आहे.

प्रकरणात संबंधित जमिनीचा जाहीरनामा दिनांक ८.९.२०११ प्रसिध्दीनुसार कोणाचेही कोणतीही हरकत अथवा आक्षेप विहीत मुदतीत किंवा हितसंबंध आता पावेतो या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. सदर प्रस्तावित क्षेत्र मौजे अकोली बु. ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं. १२/९ क्षेत्र ०.४० हे.आर. जमिनीस बिनशेती निवासी प्रयोजनसाठी परवानगी देण्याचे दृष्टीने ग्रामीण भागातील गैरनागरी क्षेत्रातील अकृषक कर आकारणी आवेदकास शासन परिपत्रक महसुल व वनविभाग क्र.एनएए-१००५/प्र.क्र.७/ल-५, दिनांक २३.१०.२००७ नुसार, तसेच महाराष्ट्र जमिन महसुल संहीता (तिसरी सुधारणा) अधिनियम २००७ अन्वये मुळ अधिनियमाचे कलम ११० चे पोट कलमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या दरानुसार दिनांक १.८.२००८ पासुन अंमलात आलेल्या अकृषक आकारणी दराप्रमाणे आकारणी निर्धारित करण्यात येत आहे, त्यानुसार अकृषक कर व त्यावरील उपकराची रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच शासनाचे वेळावेळी प्राप्त होणारे अकृषक कर आकारणी वाढीबाबतच्या आदेशाचे अनुपालन करणे सर्व आवेदकास तसेच संबंधितांना बंधनकारक राहील.

| विवरण | जमिनीचे क्षेत्रफळ चौ.मि. | अकृषक कर आकारणी रुपये ०.१० पैसे प्रति चौ.मि. |
|---|---|---|
| मौजे अकोली खुर्द ता.जि.अकोला येथील शेत शेत सर्व्हे नं. १२/९ मधिल क्षेत्र | ४०००.०० | -- |
| निवासी भुखंडाखालील क्षेत्र | २९२९.७०५ | २९३.०० |
| खुल्या जागेचे क्षेत्र | ४०७.०३ | -- |
| रस्ते व कल्व्हेचर खालील क्षेत्र | ६६३.२६५ | -- |
| एकुण रुपांतरणाखालील क्षेत्र एकुण | ४०००.०० | पुर्णांकित रक्कम २९३.०० |

155

४. जमिन अकृषक रुपांतरणाखालील अभिन्यासांतर्गत खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनिक वापरात येत असल्याने ह्या जमिनीवरील अकृषक कर आकारणीस महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(४) अन्वये खाली नमुद विवरणात दर्शविल्याप्रमाणे अकृषक आकारणीतुन सुट देण्यात येत आहे.

| विवरण | क्षेत्रफळ | सुट दिलेला आकार/कर |
|---|---|---|
| खुल्या जागेचे क्षेत्र | ४०७.०३ | ४०.७० |
| रस्ता व कर्व्हेचर खालील क्षेत्र | ६६३.२६५ | ६६.३५ |

मंजुर केलेल्या अभिन्यासातील निवासी भूखंडावर अकृषक आकारणीचा तपशिल या आदेशासोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेला आहे.

५. सदर प्रकरणात प्रस्तावित जमिनीबाबतचे मालकीहक्क, आवेदकांनी सादर केलेले कागदपत्रे, तसेच आंवेदकांचे जमिनीचे मालकीहक्क व जमिनीचे भोगवटदार वर्ग-१ चे खातेदार असल्याचे स्पष्ट होत असुन कोणताही बोजा दर्शविलेला आढळत नाही.

७. सबब उपरोक्त माहिती-अहवालान्वये मी, सुनिल विंचनकर, उपविभागीय अधिकारी अकोला या द्वारे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (२) अन्वये मौजे अकोली खुद ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं. १२/१ क्षेत्र ०.९० हे. पैकी ०.४० हे.आर या शेतजमिनीचे आवेदक १. शैलेषकुमार शर्मा (HUF) २.वरुणकुमार पुरुषोत्तम शर्मा ३.मोहीनी प्रकाश जोशी ४. धिरज हरीषकुमार पंचोली सर्व रा.द्वारा/- न्यु राधाकिसन प्लॉट अकोला यांना निवासी प्रयोजनासाठी अकृषक वापर करण्यासाठी खाली नमुद शर्ती व अटीवर परवानगी मंजुर करीत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. सदरची परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व त्याखालील प्रचलित नियमाच्या तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

२. उक्त जमिन ज्या कारणास्तव अकृषीक वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे, त्याच निवासी प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावा. सदर जमिनीचा निवासी प्रयोजनाखेरीज इतर दुस-या कारणासाठी उपयोग/वापर उपविभागीय अधिकारी अकोला यांचे पुर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

३. जमिनीच्या सिमांकित मंजुर अभिन्यासातील भुखंडकाचे विभाजन उपविभागीय अधिकारी यांचे पुर्व परवानगीशिवाय वापर करता येणार नाही. मात्र विभाजन करावयाचे झाल्यास व तसा अर्ज प्राप्त झाल्यास, सदरचे आदेशातील अटी व शर्तीचा तसेच महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम व इतर संबंधित नियमांच्या तरतुदीचा भंग होऊ न देता परवानगी देण्यास उपविभागीय अधिकारी सक्षम असतील. सक्षम अधिका-याचे पुर्व परवानगी शिवाय भुखंडकाचे विभाजन करता येणार नाही.

४. आवेदकानी सादर केलेल्या अभिन्यासानुसार तसेच तालुका निरीक्षक,भुमि अभिलेख अकोला यांनी जागेवर तात्पुरत्या मंजुर अभिन्साप्रमाणे भुखंड निहाय मोजणी करुन क प्रतीसह अहवाल सादर केला, त्याप्रमाणे अर्जदार यांनी सिमांकित अभिन्यास सादर केलेत, सदरहू सिमांकित अभिन्यासास सहायक संचालक नगर रचना अकोला यांनी अंतीम मंजुरी प्रदान करुन अकृषक आकारणीसाठी शिफारस केल्यानुसार उक्त जमिनीची निवासकामी अकृषक वापराची परवानगी देण्यात येत आहे. जागेच्या हद्दीबाबत काही तक्रार अथवा कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहतील.

५. आवेदक/भुखंडधारक यांना जागेवर बांधकाम करण्यापुर्वी स्थानिक प्राधिकरणाकडुन बांधकामाबाबतचे नकाशे, बांधकाम नियमावाली प्रमाणे मंजुर करुन घेणे बंधनकारक राहील.

६. अभिन्यासाखालील भुखंडात बांधकाम करतांना फ्लॅय ऍश (fly-Ash) विटाचा वापर करणे आवेदक/भुखंडधारकास बंधनकारक राहील.

156

७. अभिन्यासातील खुल्या जागा, रस्ते, लहान पुल, नाल्या इत्यादीचा विकास जमिन मालकाने स्वखर्चाने करुन महसुल विभागाचे प्रमाणित मापदंडानुसार करुन व्यवस्थापनाकरीता स्थानिक प्राधिकरणाकडे नाममात्र शुल्क रुपये १.०० चे मोबदल्यात हस्तांतरीत करावी. त्यानंतरच भुखंडक विक्री/वाटप करता येईल.

८. सदरहू अभिन्यासाप्रमाणे ग्राम पंचायत ॲक्ट नुसार आवश्यक असलेली विकास परवानगी गट ग्राम पंचायत अकोली खु. यांचेकडुन घ्यावी लागेल, तसेच अभिन्यासातील भुखंडात बांधकाम/विकास करण्यापुर्वी ब व क नगर परिषदेस लागु असलेल्या प्रचलित इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलील प्रमाणे बांधकाम नकाशे ग्राम पंचायत कडुन मंजुर करुन घ्यावे लागतील.

९. अभिन्यासातील सार्वजनिक वापरासाठी प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा वापर खुली जागा/क्रिडांगण या करीताच करण्यात यावा. त्यावर कोणतेही कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. खुल्या जागेमध्ये सार्वजनिक सुविधा भुखंडवर जल पुर्नभरणची (Rain Water harvesting) व्यवस्था स्वखर्चाने करणे आवेदकास करणे बंधनकारक राहील.

१०. सदर सिमांकित मंजुर अभिन्यास मधील रस्ते, खुली जागा, बाजुचे इतर अभिन्यास यांचेशी समन्वय साधुन सर्वाकरीता वापर/खुले ठेवणे बंधनकारक राहील.

११. सिमांकीत मंजुर अभिन्यासातील जागेच्या विकासाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमानुसार संबंधित स्थानिक प्राधिकरणांकडे विकास शुल्क भरुन बांधकामाची आवश्यक परवानगी प्राप्त करुन घ्यावी लागेल.

१२. सिमांकित मंजुर अभिन्यासातील सार्वजनिक कामाकरीता राखुन ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ एकुण क्षेत्रफळाच्या १० टक्केपेक्षा प्रत्यक्ष मोक्यावर कमी ठेवता येणार नाही.

१३. अभिन्यासामधील जागेवर अथवा नियमबाहय बांधकाम केल्यास आवेदक/ संबंधित भुखंडधारक यांचे विरुध्द प्रचलित नियमान्वये कार्यवाही करण्यात येईल, त्याबाबतचा शासनास येणारा खर्च जमिन महसुल म्हणुन वसुलीस पात्र राहील व आवेदक अथवा संबंधित भुखंडधारक यांना त्यांचा भरणाकरणे बंधनकारक राहील.

१४. भुखंडावर बांधकाम करताना खालील प्रमाणे समासाची अंतरे सोडणे भुखंडधारकांस बंधनकारक राहील.

| भुखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मि.) | समोरुन/रस्त्याकडुन सोडावयाचे अंतर | मागील बाजुने सोडावयाचे अंतर | दोन्ही बाजुने सोडावयाचे अंतर |
|---|---|---|---|
| ३००.०० चौ.मि.पेक्षा जास्त | ४.५० मिटर | ३.०० मिटर | २.२५ मिटर |
| १५०.०० चौ.मि. पेक्षा जास्त | ३.०० मिटर | १.५० मिटर | १.५० मिटर |
| ५० ते १०० चौ.मि. आकाराचे भुखंड | २.२५ मिटर | २.२५ मिटर | -- |

१५. अभिन्यासातील जमिनीवर निव्वळ निवासी प्रयोजनार्थ क्षेत्र २९२९.७०५ त्याप्रमाणे ०.१० पैसे प्रति चौ.मि. प्रमाणे अकृषक कर पुर्णांकित रक्कम २९३/- (रुपये दोनशे त्र्याणव फक्त). तसेच जिल्हा परिषद सेस अकृषक आकारणीचे ७ पटीत म्हणजे २०५१/-(रुपये दोन हजार एक्कावन फक्त) निश्चित होत आहे, तसेच ग्राम पंचायत सेस रुपये २९३/-(रुपये दोनशे त्र्याणव फक्त) प्रतिवर्ष आकारणी निश्चित होत असुन,

157

आवेदकास प्रतिवर्ष अकृषक कर आकारणीचा भरणा बंधनकारक राहील. तसेच यासंबंधी शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील. आवेदकाने सदरक्षेत्राचे रुपांतरणाबाबत अकृषक आकारणीच्या पाचपटीत रुपांतर कर रक्कम रुपये १४६५/-(रुपये एक हजार चारशे पासष्ट फक्त) चा भरणा करणे बंधनकारक राहील.सदरच्या जागेबाबत सद्याच्या प्रचलित दराने अकृषक आकारणी निर्धारित करुन देणेत आली आहे, परंतु यासंबंधी शासनाचे वेळावेळी प्राप्त होणारे अकृषकआकारणी वाढीबाबतचे आदेशाचे अनुपालन करणे आवेदकांस तसेच संबंधित भुखंडकधारकांना बंधनकारक राहील व सदरहू निर्धारित करुन देण्यात आलेली आकारणी शासनाचे आदेशानुसार फेरबदलास/पुर्नविलोकनास पात्र राहील, सबब यासंबंधी वेळोवेळी शासनाकडुन निर्गमित होणारे नियम व अटीचे पालन करणे भुखंडधारकास बंधनकारक राहील.

१६. आवेदकाने प्रस्तावित जमिनीचा प्रत्यक्ष अकृषक वापर एक वर्षाचे आंत करावा, व तसे केल्याबाबतचा अहवाल जमिनीचा वापर सुरु केल्यापासुन एक महिण्यात या कार्यालयास संबंधित तलाठी/तहसिलदार यांचेमार्फत सादर करावा, तसे न केल्यास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ नुसार कार्यवाही करण्यात येईल.सदर अभिन्यासमधील जमिनीचे विकास अंतर्गत पाणी पुरवठा, विजपुरवठा, अंतर्गत रस्ते, नाल्या सोई उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आवेदकाची राहील.

१७.सदर अभिन्यासमधील जमिनीचा विकास आवेदकाने परवानगी दिनांकापासुन एक वर्षाचे आंत करावा व तसा अहवाल संबंधित तलाठी/तहसिलदार यांचे मार्फत सादर करावा अन्यथा सदरची परवानगी ही एक वर्षानंतर आपोआप व्यपगत होईल.

१८. वरीलपैकी कोणतही अटीचे/शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त बाबतीत नियमानुसार उपविभागीय अधिकारी जो दंड आकारतील त्याचा भरणा करणे आवेदकास बंधनकारक राहील अथवा आदेशातील अटीचे उल्लंघन केल्यास आदेश रद्द केल्या जातील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामाची संपुर्ण जबाबदारी आवेदकाची राहील.

<u>विशेष अट :</u> प्रकरणांतर्गत आवेदकाने सादर केलेले मालकीहक्काबाबतचे कागदपत्र अभिलेखावरुन जमिन त्यांच्या ताब्यातील व मालकीची असल्याचे दिसुन येते. तथापी भविष्यात जमिनीबाबत/जमीनीचे मालकीहक्क, वारसहक्क, जमीनीच्या हद्दीबाबत किंवा अन्य बाबीचे वादामुळे कोणत्याही हक्कास बाधा आल्यास तसेच आवेदकाने सदरचे आदेशातील अटी व शर्ती तसेच नगर रचना कार्यालयाने दिलेल्या अटी व शर्थीचे उल्लंघन केल्यास सदर निवासी प्रयोजनार्थ अकृषक वापराची परवानगी आदेश रद्द/व्यपगत होतील.

(उप विभागीय अधिकारी, अकोला — seal)

सही/-
उपविभागीय अधिकारी
अकोला.

प्रतिलीपी :- मा.जिल्हाधिकारी अकोला माहितीसाठी सविनय सादर
२. सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला
३. तहसिलदार अकोला/ तलाठी मौजे अकोली खुर्द मार्फत तहसिलदार अकोला
४. सचिव, ग्राम पंचायत अकोली खुर्द ता.अकोला जि.अकोला
५. अर्जदार शैलेषकुमार शर्मा (HUF) व इतर तिन रा.अकोला

उपविभागीय अधिकारी
अकोला.

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
अकोला शाखा
आवक क्र ८६
दिनांक ४/१/२०१२
फाईल नं. ---

158

प्रपत्र -अ

विषय मौजे अकोली खु ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं. १२/९ पैकी एकुण क्षेत्र ०.४० आर जमिनीच्या निवासी प्रयोजनाकरीता अकृषक वापरास परवानगी मिळणेबाबत

अर्जदार शैलेषकुमार शर्मा (HUF) व इतर तिन रा.अकोला

रामाक्र.एनओपी-३४/अकोली खुर्द/१०/२०१९-२०२२

| भुखंड क्रमांक | एका भुखंडाचे क्षेत्र चौ.मि. | भुखंडाचे प्रति चौ.मि. अकृषक कर प्रति चौ.मि.०.१० पैसे प्रमाणे | जि.प.सेस | ग्राम पंचायत सेस |
|---|---|---|---|---|
| १ | .२. | ३. | ४. | ५ |
| १. | ४८५.०४ | ४८.५० | ३३९.५५ | ४८.५० |
| २. | ३६०.४३ | ३६.०५ | २५२.३० | ३६.०५ |
| ३. | ३१५.२८ | ३१.५५ | २२०.७० | ३१.५५ |
| ४. | ३१०.३३५ | ३१.०५ | २१७.२५ | ३१.०५ |
| ५. | ३१४.२२ | ३१.४५ | २२०.०० | ३१.४५ |
| ६. | २२०.०० | २२.२० | १५५.४० | २२.४० |
| ७. | २२०.०० | २२.२० | १५५.४० | २२.४० |
| ८. | ३२०.३७५ | ३२.०५ | २२४.३० | ३२.०५ |
| ९. | ३८३.९६५ | ३८.४० | २६८.८० | ३८.४० |
| एकुण | २९२९.७०५ | २९३.०० | २०५१.०० | २९३.०० |

उप विभागीय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला

23/12/1

उपविभागीय अधिकारी
अकोला.